निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
बुधवार
२१ जानेवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३२७ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## संक्षिप्त

### शिक्षक पात्रता परीक्षेच्या गुण पडताळणीसाठी २१ जानेवारीपर्यंत आक्षेप नोंदवा

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) २०२५ चा अंतरिम निकाल नुकताच जाहीर करण्यात आला आहे. निकालाच्या अनुषंगाने गुण पडताळणी करावयाची असल्यास अथवा त्रुटी/आक्षेप असल्यास http://mahatet.in या संकेतस्थळावर २१ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी सहा वाजेपर्यंत उमेदवार/ परीक्षार्थींना लॉगिन करुन ऑनलाईन पद्धतीने आक्षेप नोंदविता येईल, असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी कळविले आहे.

अन्य मार्गाने आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची संबंधित सर्व उमेदवार परीक्षार्थींनी नोंद घ्यावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

### महिला शेतकऱ्यांसाठी २३ जानेवारी रोजी मुंबईत चर्चासत्र

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/** महाराष्ट्र सरकारचा कृषी विभाग आणि एमएस स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशन (एमएसएसआरएफ) यांच्या संयुक्त विद्यमाने महिला शेतक-यांच्या विविध विषयाच्या अनुषंगाने २३ जानेवारी २०२६ रोजी मुंबईत चर्चासत्र होणार आहे. या चर्चासत्राचे उद्घाटन कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, कृषी राज्य मंत्री ड आशिष जयस्वाल यांच्या उपस्थितीत सह्याद्री अतिथीगृह येथे हॉल क्रमांक ४ येथे सकाळी १० वाजता होणार आहे.

कृषी विभागाने आणि एमएस स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशन (एमएसएसआरएफ) यांच्यात आणि महिला सक्षमीकरण, संसाधन हक्क, पोषण सुरक्षा, लिंग न्याय, पर्यावरणीय शाश्वतता शेतकरी समृद्धी मजबूत करण्यासाठी मदत करणारे व्यापक धोरण तयार करण्यासाठी आणि अंमलबजावणी कार्यक्रमांची आखणी करण्यासाठी संयुक्तपणे सामंजस्य करार केला आहे. या करारातंर्गत शेतकरी महिलांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच उपक्रमांतर्गत या विविध विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्राला कृषि विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, एमएस स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ.सौम्या स्वामीनाथन, कुमारीबाई, व्दारकाताई, सल्लागार समितीचे डॉ.गोविंद केळकर,सीमा कुलकर्णी, एमएस स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशनच्या कार्यकारी संचालक डॉ. आर. रेंगलक्ष्मी, मीरा सौदरराजन यांची व्याख्याने होणार आहेत. हे चर्चासत्र सकाळी १० ते २ या वेळेत होणार आहे.

### कृषी विभागाचा शेतकरी परदेश अभ्यास दौरा योजनेनिमित्त पहिला गट रवाना



**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/** कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांची ज्ञानवृद्धी व आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने शेतकरी परदेश अभ्यास दौरा योजनामधील रवाना झालेल्या शेतकऱ्यांना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून संवाद साधून शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी परदेशातील आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अभ्यास करून तो अनुभव राज्यातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन केले.

शेतकरी परदेश अभ्यास दौरा योजनाअंतर्गत २०२५-२६ या वर्षात तीन अभ्यास दौरे नियोजित आहेत. त्यामध्ये युरोप, इस्त्राईल आणि मलेशिया, व्हिएतनाम, फिलिपाईन्स या देशांचा समावेश आहे. या योजनेअंतर्गत १७ जानेवारी २०२६ रोजी मलेशिया, व्हिएतनाम व फिलिपाईन्स या तीन देशांचा एकत्रित अभ्यासदौरा आयोजित केला आहे. या दौऱ्यातील सहभागी शेतकऱ्यांनी पुणे येथून मुंबई मार्गे पुढे प्रस्थान केले असून, या दौऱ्यामध्ये राज्यातील १५ प्रगतशील शेतकरी, १ कृषी विभाग अधिकारी तसेच १ प्रवासी कंपनी प्रतिनिधी हे सहभागी झाले आहेत.

या अभ्यास दौऱ्यामध्ये सहभागी शेतकऱ्यांना आधुनिक शेती पद्धती, संरक्षित शेती, कृषी प्रक्रिया उद्योग, निर्यातक्षम उत्पादन तंत्रज्ञान, तसेच विविध देशांतील कृषी व्यवस्थापन व विपणन व्यवस्था यांचा प्रत्यक्ष अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे. या अनुभवाचा उपयोग करून राज्यातील शेती अधिक उत्पादनक्षम व शाश्वत करण्यास मदत होणार आहे.विशेष बाब म्हणजे, २०१९ नंतर आयोजित करण्यात आलेला हा पहिलाच परदेश अभ्यास दौरा असून कृषी विभागाने पुन्हा एकदा ही महत्वाकांक्षी योजना प्रभावीपणे राबविण्यास सुरुवात केली आहे. कृषी विभागाच्या या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील शेती तंत्रज्ञानाची माहिती मिळून राज्यातील शेती विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास विभागाने व्यक्त केला आहे.

# महाराष्ट्र भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस

**आत्ताच एक्सप्रेस**

**दावोस/प्रतिनिधी/** भारतातील उद्योग आणि गुंतवणूक क्षेत्रासाठी महाराष्ट्रच गेटवे-ऑफ-इंडिया' असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधान खरे ठरवणारे तब्बल १४ लाख ५० हजार कोटींचे गुंतवणूक करार पहिल्याच दिवशी करण्यात आले. या गुंतवणुकीसोबतच राज्यात १५ लाख रोजगार संधी निर्माण होणार आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाच्या माध्यमातून यंदा विविध विभागांनी आणि विविध क्षेत्रातील उद्योगांच्या प्रतिनिधी समवेत मुख्यमंत्री श्री.फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

हरित ऊर्जा, अन्न प्रक्रिया, पोलाद निर्मिती, आयटी-आयटीईस, डाटा सेंटर्सह ईव्ही- ऑटोमोबाईल, जहाज बांधणी, डिजिटल इन्फ्रा अशा विविध क्षेत्रातील ही गुंतवणूक मुंबईसह राज्याच्या रत्नागिरी, पालघर, गडचिरोली, अहिल्यानगर या भागात पोहोचणार असल्याने, तेथे उद्योग वाढीसह मोठ्या प्रमाणा रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्यासह महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाचे प्रतिनिधीमंडळ दावोस येथे उपस्थित आहे. दावोस मधील पहिल्याच दिवसापासून जगभरातील विविध क्षेत्रातील उद्योगांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी स्वारस्य दर्शवणे सुरु केले. यातून गुंतवणुकीचा मोठा ओघ सुरु झाल्याने महाराष्ट्र पॅव्हेलियनमध्ये उत्साहाचे चित्र निर्माण झाले.

तत्पूर्वी, दावोस मधील महाराष्ट्र पॅव्हेलियनचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले.' भविष्याचे वेध घेण्यासाठी सज्ज, विश्वासार्ह आणि दीर्घकाळचा भागीदार म्हणून महाराष्ट्र स्वागत करीत आहे. भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस म्हणून



## पहिल्याच दिवशी १४ लाख ५० हजार कोटी गुंतवणुकींचे १९ सामंजस्य करार

## - पंधरा लाख रोजगार संधी, आयटी, डाटा सेंटर, हरित ऊर्जा क्षेत्रात गुंतवणूक

महाराष्ट्र जगाला, उद्योग विश्वाला साद घालत आहे, अशी मनोदय भावनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केली.

सामंजस्य करारांवरील स्वाक्षरी व करारांच्या आदान-प्रदान प्रसंगी झालेल्या चर्चेत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, 'महाराष्ट्रावरील उद्योग क्षेत्राचा, गुंतवणुकदारांचा हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी आम्ही सदैव सज्ज आहोत. येथे होणाऱ्या करारांवरील पुढील कार्यवाहीबाबत वॉर रूमच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येईल. उद्योजकांना आवश्यक सुविधा वेळेत आणि दर्जदार पद्धतीने मिळाव्यात याची काळजी घेतली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

'उद्योजक - गुंतवणूकदारांकडून मिळत असलेला प्रतिसाद पाहता, यंदा गतवर्षीहून अधिक गुंतवणूक आणि रोजगार संधीचे सामंजस्य करार होतील असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. विशेषतः मुंबईतील घन कचरा व्यवस्थापन, हवा आणि पाणी गुण संनियत्रणाच्या माध्यमातून सर्क्युलर ईकॉनॉमीची संरचना उभी केली जात आहे. तसेच महाराष्ट्र हे अमर्याद संधीचे राज्य आहे. त्याबाबत आणि एमएमआर क्षेत्राच्या विकासासह, तिसऱ्या मुंबईच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र आर्थिक सल्लागार समितीने आराखडा निश्चित करून दिला आहे. या माध्यमातून व्यवसायाच्या आणि चांगल्या पगाराच्या रोजगार निमिर्तीवर भर दिला जात असल्याचेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणाले.

दरम्यान, आगामी दोन दिवसात दावोसमध्ये एआय़, क्वांटम कंम्प्युटींग, डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर, यांसह फिनटेक, लॉजिस्टिक्स अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर तसेच जहाज बांधणी, ईव्ही, अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील आणखी काही उद्योग घटकांशीही गुंतवणुकीचे सामंजस्य करार होणार आहेत. त्यादृष्टीने त्यांच्या प्रतिनिधींशी, बोलणी -चर्चांच्या फेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार गतवर्षी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा कक्ष (च-खढठख) या गुंतवणूक आणि उद्योग सुलभतेला प्रोत्साहन देणाऱ्या समर्पित संस्थात्मक व्यवस्थेमुळे यंदा गुंतवणूकदार, उद्योग क्षेत्राचा महाराष्ट्राकडील ओघ आणखी वाढला आहे.

### सामंजस्य करार पुढीलप्रमाणे

**- महाराष्ट्र सरकार- काल्सबर्ग**
क्षेत्र: अन्न प्रक्रिया आणि कृषी
गुंतवणूक: ५०० कोटी
रोजगार : ७५०

**- महाराष्ट्र सरकार- योकी ग्रीन एनर्जी प्रा. लि.**
क्षेत्र: नविनिकरणीय ऊर्जा
गुंतवणूक: ४ हजार कोटी
रोजगार : ६ हजार
ठिकाण: पालघर/एमएमआर

**- महाराष्ट्र सरकार- बीएफएन फॉर्जिंग्स**
क्षेत्र: स्टील
गुंतवणूक: ५६५ कोटी
रोजगार : ८४७
ठिकाण: पालघर/एमएमआर

**- एमएमआरडीए-सुमिटोमो रियालिटी**
गुंतवणूक: सुमारे ८ बिलियन डॉलर्स
रोजगार : ८० हजार.

**- एमएमआरडीए-के. रहेजा**
गुंतवणूक: सुमारे १० बिलियन डॉलर्स
रोजगार : एक लाख.

**- एमएमआरडीए-अल्टा कॅपिटल/पंचशील**
गुंतवणूक: सुमारे २५ बिलियन डॉलर्स
रोजगार : २ लाख ५० हजार.

**- एमएमआरडीए-एसबीजी समूह**
क्षेत्र: लॉजिस्टिक्स
गुंतवणूक: सुमारे २० बिलियन डॉलर्स
रोजगार : ४ लाख ५० हजार.

**- एमएमआरडीए- आयआयएसएम ग्लोबल**
गुंतवणूक: सुमारे ८ बिलियन डॉलर्स
रोजगार : ८० हजार.

**- एमएमआरडीए-जायका**
धोरण आणि स्ट्रॅटेजी पार्टनर
एमएमआरडीए-सेम्बकॉर्प डेवलपमेंट लि. सिंगापूर
एकीकृत इंडस्ट्रियल पार्कसाठी नॉलेज पार्टनर
एमएमआरडीए-टेक्निकल युनिव्हर्सिटी, मुनीच, जर्मनी
शाश्वत नागरी वाहतूक प्रणाली

**- महाराष्ट्र सरकार- सुरजागड इस्पात**
क्षेत्र: स्टील
गुंतवणूक: २० हजार कोटी
रोजगार: ८ हजार.
ठिकाण: गडचिरोली

**- महाराष्ट्र सरकार-लोढा डेव्हलपर्स**
क्षेत्र: आयटी, डेटा सेंटर्स
गुंतवणूक: १ लाख कोटी
रोजगार: १ लाख ५० हजार.




# 'हिंद दी चादर' ३५० वा शहीदी समागम जागतिक स्तरावर नेण्यासाठी सज्ज व्हा; राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांचे प्रशासनाला निर्देश

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड/ प्रतिनिधी /** 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाचे आयोजन केवळ नांदेडपुरते मर्यादित न ठेवता ते जागतिक स्तरावर पोहोचवण्यासाठी सर्व यंत्रणांनी सूक्ष्म नियोजन आणि समन्वयाने काम करावे, असे स्पष्ट निर्देश राज्याच्या नगरविकास, परिवहन व सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले. नांदेड येथे होणाऱ्या या ऐतिहासिक सोहळ्याच्या पूर्वतयारीचा आढावा त्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे घेतला.या बैठकीला जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, राज्यस्तरीय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, समिती अध्यक्ष डॉ. विजय सतबीर सिंग, तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

व्यापक प्रचार आणि प्रसिद्धीवर भर

राज्यमंत्री मिसाळ यांनी सूचना दिली की, या कार्यक्रमाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया आणि मुद्रित माध्यमांचा प्रभावी वापर करावा.



शालेय उपक्रम: विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना रुजवण्यासाठी शाळांमध्ये निबंध व वक्तृत्व स्पर्धा आयोजित करून त्याची माहिती पोर्टलवर अपलोड करावी.प्रत्येक जिल्ह्यात होर्डिंग्ज लावणे आणि सिनेमागृहांमध्ये भक्तिगीते प्रसारित करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. कार्यक्रमस्थळी पिण्याचे पाणी, स्वच्छ प्रसाधनगृहे आणि महिला, ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांसाठी पार्किंगपासून कार्यक्रमस्थळापर्यंत विशेष वाहतूक व्यवस्था सुनिश्चित करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

२५ जानेवारीला दिग्गज नेत्यांची उपस्थिती

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी माहिती दिली की, श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेडमधील असरजन परिसरातील ५२ एकर मैदानावर भव्य सोहळा होणार आहे. या कार्यक्रमाला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, आणि आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांच्यासह अनेक संत-महात्मे उपस्थित राहणार आहेत.

१० लाख भाविकांसाठी लंगर आणि निवास व्यवस्था

प्रशासनाने या सोहळ्यासाठी युद्धपातळीवर तयारी केली असून खालील विशेष सुविधा उपलब्ध केल्या आहेत.मैदानालगत दोन भव्य टेन्ट सिटी उभारल्या असून, त्यात १४ हजार भाविकांची राहण्याची सोय आहे. याशिवाय शहरातील शाळा आणि मंगल कार्यालयांमध्येही निवास व्यवस्था केली आहे.सुमारे १० लाख भाविकांना लाभ घेता येईल अशी भव्य लंगर (भोजन) व्यवस्था करण्यात आली आहे.५० हजार नागरिकांची नेत्र तपासणी आणि विशेष कर्करोग तपासणी स्टॉल्स यांसह मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय पथके तैनात असतील. स्वयंसेवकांची नियुक्ती आणि प्रत्येक सुविधेसाठी नोडल अधिकाऱ्यांकडे जबाबदारी सोपवण्यात आली आहे.प्रशासन या सोहळ्यासाठी पूर्णपणे सज्ज असून, भाविकांना कोणत्याही अडचणी येऊ नयेत यासाठी सर्व विभाग समन्वयाने काम करत आहेत, असे जिल्हाधिकारी कर्डिले यांनी यावेळी आश्वस्त केले.

# स्मृतींचे राजकारण : शासन निर्णयातून वगळले गेलेले राष्ट्रपुरुष आणि अस्वस्थ करणारे वास्तव

लोकशाही ही केवळ निवडणुकांची प्रक्रिया नसून ती सामूहिक स्मृती, मूल्ये आणि परंपरा यांवर उभी असते. एखादा समाज कोणाला स्मरतो, कोणाला विसरतो आणि कोणाला जाणीवपूर्वक बाजूला सारतो, यावर त्या समाजाची वैचारिक दिशा ठरते. याच पार्श्वभूमीवर २०२६ मध्ये राष्ट्रपुरुष, थोर व्यक्ती यांच्या जयंती-पुण्यतिथी व राष्ट्रीय दिन साजरे करण्याबाबत काढण्यात आलेल्या शासन निर्णयातून जगतगुरू संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज आणि माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंती-पुण्यतिथी वगळल्या गेल्याची बाब केवळ प्रशासकीय नव्हे, तर गंभीर वैचारिक प्रश्न उपस्थित करणारी ठरते. हा निर्णय चुकून झाला आहे का? की तो एका ठराविक विचारसरणीचा सूचक आहे? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, संतपरंपरा आणि आधुनिक राष्ट्रनिर्मितीत योगदान देणाऱ्या नेत्यांना वगळणे हे कुठल्या भारताची कल्पना मांडते?

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज हे केवळ धार्मिक संत नव्हते; ते सामाजिक क्रांतिकारक व महाराष्ट्राच्या आत्म्याचे शिल्पकार होते. त्यांनी समाजाला भक्तीच्या नावाखाली पलायनवाद शिकवला नाही, तर समतेचा, विवेकाचा आणि मानवतेचा मार्ग दाखवला. ज्ञानेश्वरांनी अवघ्या तरुण वयात लिहिलेली ज्ञानेश्वरी ही ग्रंथरचना संस्कृतच्या मक्तेदारीला आव्हान देत मराठीला ज्ञानभाषा बनवणारी ठरली. विश्वचि माझे घर ही भूमिका मांडणारा हा संत आजही समावेशक भारताची संकल्पना सांगतो. संत तुकाराम महाराजांनी अभंगातून अन्याय, दांभिकता आणि सामाजिक विषमतेवर प्रहार केला. जाति कुळ धर्म नाही उरला असे सांगणाऱ्या तुकारामांचे विचार आजही समाजातील भिंती तोडणारे आहेत. अशा संतांना शासन निर्णयातून वगळणे म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक मुळांनाच दुय्यम ठरवण्यासारखे आहे.




महाराष्ट्राची संतपरंपरा ही कर्मकांडप्रधान नव्हे, तर मानवकेंद्रित परंपरा आहे. संतपरंपरा म्हणजे श्रद्धा नव्हे, तर सामाजिक संविधान आहे. इथे देवापेक्षा माणूस महत्त्वाचा ठरतो. त्यामुळेच फुले-शाहू-आंबेडकर यांनी संतपरंपरेला सामाजिक परिवर्तनाचा पाया मानला. अशा परंपरेतील दोन प्रमुख स्तंभ, ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांची जयंती-पुण्यतिथी शासनाच्या अधिकृत यादीतून वगळली जाणे म्हणजे समतेच्या विचारधारेला बाजूला सारण्याचा संकेत आहे का, असा प्रश्न निर्माण होतो.

दुसरीकडे, माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती-पुण्यतिथी वगळली जाणेही तितकेच चिंताजनक आहे. राजीव गांधी हे कोणत्याही पक्षापुरते मर्यादित नेते नव्हते; ते आधुनिक भारताच्या तंत्रज्ञानात्मक आणि प्रशासकीय सुधारणांचे शिल्पकार होते. पंचायतराज व्यवस्था, १८ वर्षांवरील मताधिकार, संगणकीकरण, दूरसंचार क्रांती, तरुणांना राजकारणात संधी, या सगळ्या गोष्टींनी भारताला २१व्या शतकात प्रवेश करण्यासाठी तयार केले. आज डिजिटल इंडियाची भाषा बोलताना, त्याचे मूळ रोवणाऱ्या नेतृत्वाला विसरणे हा इतिहासाशी केलेला अन्याय ठरतो. कोणत्या व्यक्तींच्या जयंती-पुण्यतिथी शासनस्तरावर साजऱ्या करायच्या, हा निर्णय केवळ प्रशासकीय सोयीचा नसतो. तो राज्याच्या वैचारिक भूमिकेचे प्रतिबिंब असतो. त्यामुळेच हा निर्णय तांत्रिक म्हणून दुर्लक्षित करता येत नाही. जर संतपरंपरा आणि आधुनिक राष्ट्रनिर्मितीतील नेत्यांना वगळले जात असेल, तर मग कोणत्या मूल्यांना प्राधान्य दिले जात आहे? हा प्रश्न उभा राहतो. शासन हे सर्वसमावेशक असते की निवडक स्मृतींवर उभे राहते, याची चाचणी अशाच निर्णयांतून होते.

इतिहास हा केवळ पुस्तकांत नसतो; तो स्मरणोत्सवांत, सार्वजनिक कार्यक्रमांत आणि सामूहिक साजरीकरणात जिवंत राहतो. ज्या क्षणी शासन पातळीवर एखाद्या व्यक्तीचे स्मरण थांबते, त्या क्षणी हळूहळू तिचे विचारही बाजूला पडण्याचा धोका निर्माण होतो. संत तुकाराम-ज्ञानेश्वर किंवा राजीव गांधी यांना वगळणे म्हणजे फक्त नावांची




कपात नव्हे, तर विचारांची कपात आहे. महाराष्ट्र म्हणजे केवळ भौगोलिक राज्य नव्हे; तो संत-समता-सुधारणांचा प्रदेश आहे. जर याच परंपरेला शासन निर्णयातून दुय्यम स्थान दिले गेले, तर उद्या फुले, शाहू, आंबेडकर यांच्याबाबतही असेच होणार नाही, याची खात्री कोण देणार? हा प्रश्न भावनिक नसून राज्याच्या आत्म्याशी संबंधित आहे.

२०२६ च्या शासन निर्णयाने एक स्पष्ट गरज अधोरेखित केली आहे, इतिहास, संस्कृती आणि राष्ट्रनिर्मिती यांचा समतोल राखणारे निर्णय घेण्याची. कोणालाही वगळून, कुणाला प्राधान्य देऊन समाज एकसंध राहत नाही. संतपरंपरा आणि आधुनिक नेतृत्व हे विरोधी नाहीत; ते एकाच भारतीय प्रवासाचे वेगवेगळे टप्पे आहेत. त्यांना वेगळे करण्याचा प्रयत्न म्हणजे भारताच्या समावेशक आत्म्यालाच धक्का देणे होय. शासनाने हा निर्णय पुनर्विचारात घ्यावा, ही केवळ मागणी नाही; ती लोकशाहीची अपेक्षा आहे. कारण राष्ट्र उभे राहते ते केवळ भविष्यातील स्वप्नांवर नाही, तर जपलेल्या स्मृतींवर. महाराष्ट्राची ओळख ही केवळ सत्तेच्या निर्णयांनी घडलेली नाही; ती संतांच्या अभंगांनी, विचारवंतांच्या लेखणीतून आणि राष्ट्रउभारणीत योगदान देणाऱ्या नेत्यांच्या दूरदृष्टीतून घडलेली आहे. त्या स्मृती जपणे ही कोणाची मक्तेदारी नाही, तर शासनाची घटनात्मक आणि नैतिक जबाबदारी आहे.

जगतगुरू संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज आणि राजीव गांधी यांची जयंती-पुण्यतिथी शासन निर्णयातून वगळणे हा केवळ प्रशासकीय बदल नसून, सामूहिक स्मृती पुसण्याचा धोकादायक प्रयत्न ठरू शकतो. आज जर हे स्वीकारले, तर उद्या कोणाचे नाव यादीतून गळेल याची शाश्वती कोण देणार? शासनाने तात्काळ या निर्णयाचा पुनर्विचार करावा. स्मरणोत्सव ही औपचारिकता नाही; ती पिढ्यांना मूल्यांची ओळख करून देणारी शाळा असते. संतांचा विवेक, समाजसुधारकांचा मानवतावाद आणि आधुनिक राष्ट्रनिर्मात्यांची दूरदृष्टी, या तिन्ही प्रवाहांशिवाय महाराष्ट्र अपूर्ण आहे. आज गरज आहे ती विभाजनाच्या नव्हे, तर समावेशनाच्या निर्णयांची. सत्तेच्या बदलत्या समीकरणांपेक्षा समाजाच्या दीर्घकालीन आत्म्याला प्राधान्य देण्याची. कारण स्मृती जपणारेच राष्ट्र घडवतात;

आणि स्मृती पुसणारे इतिहासाच्या कठड्यावर उभे राहतात. शासनाने हे लक्षात ठेवावे की, संत, राष्ट्रपुरुष आणि विचारवंत यांना वगळून नव्हे, तर त्यांना सन्मान देऊनच लोकशाही मजबूत होते.

**– प्रवीण बागडे,** नागपूर, मो.क्र. ९९२३६२०९१९

# आपला तर्कशुद्ध अनुमान अन् सरकारचा गेम प्लॉन अखेर यशस्वी

सर्वसामान्य रयतेची काळजी आणि रक्षणार्थ लोकप्रतिनिधींची एक व्यवस्था अथवा संस्था म्हणजेच सरकार... ती देशाचे किंवा राज्याचे कामकाज चालवत असते. जी कायदे बनवते, धोरणे ठरवते आणि नागरिकांच्या हितासाठी देशाचा कारभार पाहते. जसे की कायदा व सुव्यवस्था राखणे, शिक्षण आणि आरोग्य सेवा पुरवणे. यात कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायपालिका असे विविध भाग असतात, जे शासनाचे अधिकार वापरतात. परंतु आजचे सरकार याच्या विपरीत कार्य करताना दिसून येते. सरकार कोणतेही असले आणि योजना कोणतीही का असेना...जेव्हा ती चालविणे होत नसेल, तर सरळसरळ बंद करून टाकावी. उगाच तिचा तमाशा करू नये. आज ब-याच अशा योजना आहे, जिचा केवळ तमाशा होतोय.

त्याच योजनेतील एक योजना म्हणजे 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना.' महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सुरू केलेली 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' सध्या व्यवस्थेच्याच जाळ्यात अडकली आहे. केवायसीच्या नावाखाली विचारण्यात आलेले दिशाभूल करणारे प्रश्न अनेक लाडक्या बहिणींसाठी घातक ठरले असून हजारो महिलांचे हप्ते अचानक बंद झाले आहेत.

योजनेचा महायुतीला विधानसभेसोबतच इतर निवडणुकीमध्ये फायदा झाला. योजनेच्या सुरुवातीला महिलांच्या खात्यात नियमित रक्कम जमा होत होती. मात्र, केवायसी सक्तीची केल्यानंतर कोणतीही पूर्वसूचना न देता फक्त एका चुकीच्या क्लिकमुळे महिला अपात्र ठरत असल्याचे समोर आले आहे. केवायसी करताना 'माझ्या कुटुंबातील सदस्य




कायम कर्मचारी म्हणून राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत नाही किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत नाही' अशाप्रकारचे एमपीएससीच्या धर्तीवरील दोन प्रश्न अनेक महिलांना गोंधळात टाकणारे ठरले. महिलांनी घरातील कोणताही व्यक्ती शासकीय नोकरीवर नाही, असे उत्तर टाकले; परंतु येथे निवृत्तीवेतन घेत नाही. यासाठी होय असे उत्तर टाकणे अपेक्षित होते.

या प्रश्नांची भाषा इतकी तांत्रिक आहे की, महिलांना समजलीच नाही. समजणार तरी कशी? लाभ घेणा-या सर्वच महिला या सुशिक्षित आहेच असे नाही. जे सुशिक्षित आहे, त्यांना तरी हा प्रश्न लक्षात आलाच असेल असंही नाही. त्यामुळे त्यांची एक्झाम्स घेतल्याप्रमाणे एमपीएससीच्या धर्तीवरील प्रश्न विचारणे हे चुकीचेच होते. नोव्हेंबर व डिसेंबर महिन्याचे पैसे खात्यावर जमा झाल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला आहे. महिलांनी महिला व बालकल्याण विभागाशी संपर्क साधल्यानंतर तुमच्या घरात शासकीय नोकरदार असल्यामुळे तुमचे पैसे बंद झाले असल्याचे सांगितले जात आहे.

केवायसीसाठी ३१ डिसेंबर मुदत देण्यात आली होती. यावेळी अनेक महिलांच्या आधारकार्डला मोबाईल नंबर लिंक नव्हते. यामुळे महिलांची केवायसी दिलेल्या मुदतीत झाली नाही. मुदतवाढ मिळेल ही अपेक्षा महिलांना होती; परंतु संबंधित विभागाने तातडीने पोर्टलवरून केवायसीची प्रक्रिया बंद करून टाकली. याचा फटका हजारो महिलांना बसला आहे. लाडकी बहीण योजनेचा हप्ता मिळाला नसल्याबाबत अनेक महिला विचारणा करण्यासाठी येत आहेत. केवायसी करणे किंवा चुकीच्या दुरुस्तीबाबत शासनाकडून काहीही सूचना आलेल्या नाहीत. लाडकी बहीण योजना महिलांना आधार देण्यासाठी होती. मात्र, सध्या ती महिलांसाठी अडचणींचीच ठरत आहे. केवायसीतील गोंधळामुळे ही परिस्थिती उद्भवली असून वेगवेगळी कारणे दाखवून महिलांची संख्या कमी करण्याचा हा प्रकार आहे. शासनाने तातडीने हस्तक्षेप करून महिलांना दिलासा द्यायला पाहिजे. तसेच नवीन अर्ज दाखल करून घ्यायला पाहिजे एवढ्याच अपेक्षासह..!

**– सुनील शिरपुरे,** कमळवेल्ली, यवतमाळ (भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९)

# अंबड नगरपरिषदेवर 'महायुती'चा भगवा; उपनगराध्यक्ष व स्वीकृत सदस्यांची बिनविरोध निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड (जालना)** नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२६ मध्ये भारतीय जनता पार्टी, राष्ट्रीय समाज पक्ष (रासप) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) महायुतीने ऐतिहासिक यश संपादन केल्यानंतर, आज अंबड नगरपरिषदेत सत्तास्थापनेची प्रक्रिया मोठ्या उत्साहात पार पडली. नगराध्यक्षा सौ. देवयानीताई केदार कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्याच विशेष बैठकीत उपनगराध्यक्ष आणि स्वीकृत सदस्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीमुळे अंबड नगरपरिषदेवर महायुतीची एकहाती सत्ता प्रस्थापित झाली असून शहरात 'भगवा' फडकला आहे.



**बिनविरोध निवडीने सत्ता बळकट**

आज दि. २० जानेवारी २०२६ रोजी पालिकेच्या पंडित दीनदयाळ उपाध्याय सभागृहात नवनिर्वाचित सदस्यांची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत उपनगराध्यक्ष पदी विश्वजीत विलासराव खरात यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच, स्वीकृत सदस्य म्हणून धनराज दीपक ठाकूर व सुहास सोडाणी यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. विरोधकांचे आव्हान नसल्याने या सर्व निवडी बिनविरोध पार पडल्या, ज्यामुळे महायुतीमधील एकजूट अधोरेखित झाली आहे.या विशेष बैठकीस आणि निवडीनंतर झालेल्या सोहळ्याला जालना जिल्ह्यातील दिग्गज नेत्यांनी हजेरी लावली होती. यामध्ये प्रामुख्याने नारायण कुचे (आमदार, बदनापूर), विलासबापू खरात (माजी आमदार), गोपाळराव बोराडे, गणेशराव बोराडे, अवधूत नाना खडके, शैलेंद्र पवार, ओमप्रकाश उबाळे यांसह भाजप, रासप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक ज्येष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी केदार दादा कुलकर्णी, गंगाधर वराडे, विठ्ठलसिंग राणा, रामशेठ लांडे, सचिन खरात, शेख फिरोज, उज्वल कुचे, बंडू जाधव यांच्यासह महिला नगरसेविका सविताताई कुलकर्णी, ज्योतीताई बाबर, ताराबाई शहाणे, पदमाबाई वराडे, सावित्री गुढे, रंजनाताई खरात, ललिताताई बुर्ले व इतर सर्व नवनिर्वाचित सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विकासाचे नवे पर्व: नगराध्यक्षांचे आश्वासन**

नगराध्यक्षा सौ. देवयानीताई कुलकर्णी यांनी निवडीनंतर बोलताना स्पष्ट केले की, अंबड शहराचा सर्वांगीण विकास हेच आमचे मुख्य ध्येय आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि आरोग्य या मूलभूत सुविधांना प्राधान्य देऊन, प्रशासनाचा कारभार अधिक पारदर्शक आणि लोकाभिमुख केला जाईल.

**शहरात जल्लोषाचे वातावरण**

महायुतीच्या या निर्भेळ यशामुळे अंबड शहरात कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी आणि गुलालाची उधळण करत जल्लोष साजरा केला. अनेक वर्षांनंतर शहराच्या राजकारणात नवे पर्व सुरू झाल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. आता नव्या कारभाऱ्यांकडून शहराच्या प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक होईल, अशी आशा जनतेला आहे.

रिपोर्ट: गणेश सपकाळ,
जालना जिल्हा प्रतिनिधी.

# श्री गुरु तेग बहादुर साहिब जी- 'हिंद दी चादर'

श्री गुरु तेग बहादुर (एप्रिल १६२१ नोव्हेंबर १६७५) हे शीख धर्माचे नववे गुरु होते. त्यांचा जन्म अमृतसर (पंजाब) येथे झाला. श्री गुरू तेग बहादुर यांनी आपल्या आयुष्यात अन्याय, धार्मिक असहिष्णुता आणि अत्याचाराविरोधात लढा दिला. म्हणूनच त्यांना 'हिंद दी चादर' या नावाने गौरविले जात. धर्म, मानवता, आदर्श आणि तत्त्वांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्यांमध्ये गुरु तेग बहादुर यांचे स्थान जागतिक इतिहासात अद्वितीय आहे. श्री गुरु तेग बहादुर हे जगभर प्रभाव टाकणारे महान गुरु मानले जातात. त्यांच्या शहिदी समागमाचा इतिहास सर्वदूर पोहोचावा यासाठी गुरू तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विभाग व श्री गुरूतेग बहादुर साहिबजी ३५० शहीदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने राज्यभर विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत.

०१ एप्रिल १६२१ रोजी, अमृतसर येथे श्री गुरू गुरू तेग बहादूर यांचा जन्म वडील गुरु हरगोबिंद आणि माता नानकी देवी यांच्या कुटुंबात झाला. १६६४ मध्ये त्यांना गुरू ही पदवी प्राप्त झाली तर त्यांचे पुत्र गुरू गोविंदसिंह यांनाही गुरु पदवी प्राप्त झाली होती. गुरु तेग बहादूर यांचे मूळ नाव 'त्यागमल' होते. बालपणी एका युद्धात त्यांनी अतुलनीय शौर्य दाखवले त्यावेळी त्यांच्या वडिलांनी त्यांना 'तेग बहादूर' म्हणजेच 'तलवारीसारखा धैर्यवान' हे नाव दिले. ते अतिशय शांत, ध्यानशील आणि संयमी स्वभावाचे होते. त्यांनी मोठे भाग्य, संपत्ती, मान नाकारत आनंदपूर साहिब येथे ध्यान आणि सेवा यांमध्ये आयुष्य व्यतीत केले. धार्मिक असहिष्णुता



आणि अत्याचाराविरोधात लढा देत असताना त्यांना दिल्लीतील चांदणी चौकातील तुरूंगात ठेवण्यात आले होते. तेथे त्यांनी ध्यान करत, ईश्वराचे स्मरण करण्यास प्राधान्य दिले. मानवधिकारांच्या सुरक्षेसाठी काम करीत असताना गुरू तेग बहादुर शहीद झाले. त्यांनी लोकांना सत्य, संयम, करूणा आणि धैर्य या मुल्यांचा संदेश दिला. त्यांची अनेक भक्तिगीते गुरू ग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट आहेत. त्यांनी आनंदपूर साहिब हे पवित्र स्थळ स्थापन केले. जे आजही शीख धर्मातील अत्यंत महत्वाचे तीर्थस्थान मानले जाते. त्यांच्या बलिदानामुळे ते धार्मिक स्वातंत्र्याचे प्रतीक बनले होते. त्यांच्या स्मरणार्थ त्यांची जयंती देशभरात श्रद्धेने साजरी केली जाते. केंद्र शासनाने २०२२ मध्ये त्यांची ४०० वी जयंती देशभर साजरी केली होती. त्यांनी देशाला साधे आणि गहन तत्वज्ञान दिले व सुमारे ५७ शबद (भक्तिगीते) आणि ५७ सलोक (उपदेशपर पदे) रचले. या रचनांमध्ये वैराग्य, सत्य, मृत्यूचे चिंतन, आत्मज्ञान आणि परमेश्वरावर श्रद्धा या भावना प्रबळ आहेत. त्यांच्या सर्व रचना गुरु ग्रंथ साहिबच्या शेवटच्या भागात आहेत.

*'जो नर दुःख में दुःख नहीं मानें,*
*सुख सनेहु अरू भय नहीं जा कै, कांचन माटी मानै,*
*लोभ मोह अभिमान न ता कै, हरख सोग नहीं जा कै*
*जो नर दुःख में दुःख नहीं मानै'*

म्हणजेच जो मनुष्य दुःखात असला तरी दुःखी होत नाही, जो सुखात असला तरी अहंकार करत नाही, ज्याच्यासाठी सोने आणि माती समान आहेत, जो लोभ, मोह, अभिमान, आनंद आणि शोक यांपासून मुक्त आहे तोच खरा ज्ञानी आहे. अशा अनेक भावपूर्ण आणि मानवी जीवनाचा सार सांगणाऱ्या रचना त्यांनी केल्या आहेत. श्री गुरु तेग बहादुर साहिब यांचे जीवन निर्भयता, धार्मिक स्वातंत्र्य आणि मानवतेसाठी केलेल्या त्यागाचे प्रतीक आहे.

हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर यांच्या साहिबजीच्या शहिदीला ३५० वर्षे पूर्ण होत झाल्यानिमित्त महाराष्ट्र शासन आणि श्री गुरू तेग बहादुर साहिबजी ३५० शहीदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने राज्यात विविध ठिकाणी भव्यदिव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहेत.

नुकतेच ७ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध धार्मिक व सामाजिक संघटनांसह श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांना आदरांजली अर्पण करण्यात येऊन सामाजिक, प्रबोधनात्मक व जागृतीपर कार्यक्रम संपन्न झालेत. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहेब यांच्या ३५० व्या शहिदी समागमनिमित्त संकेतस्थळाचे आणि गुरु तेग बहादूर यांच्या बलिदानाचा इतिहास सांगणाऱ्या गीताचे लोकार्पण झाले.

**नांदेड येथे मुख्य कार्यक्रम**

'हिंदी दी चादर' श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त येत्या २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथील मोदी मैदानावर आयोजित कार्यक्रमाला केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शहा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. केंद्रीय गृहमंत्री श्री. शहा २५ जानेवारीला या कार्यक्रमाकरिता उपस्थित राहून श्री गुरु तेग बहादुर यांच्या पावन स्मृतींना अभिवादन करतील. या कार्यक्रमाच्या माध्यमातून सिख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोहयाल, सिंधी या सहा समाजातील देशभरातील सर्व संत, महंत, सामाजिक कार्यकर्ते, गणमान्य व्यक्ती, समाजबांधव एकत्र येऊन श्री गुरु तेग बहादुर साहिबजींच्या पावन स्मृतींना नमन करून त्यांचा धर्मरक्षण, सहिष्णुता आणि एकात्मतेचा-मानवतेचा संदेश सर्वदूर पोहोचविणार आहे. या शहिदी समागम कार्यक्रमातून हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या कर्तृत्व आणि विचारांचा परिचय जनतेला होणार आहे.

– विभागीय माहिती कार्यालय, अमरावती

## संक्षिप्त

### 'हिंद दी चादर' गुरु तेग बहादूर यांचा ३५० वा शहीदी समागमः छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासनाची जय्यत तयारी




**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** मानवतेच्या रक्षणासाठी आणि धर्माच्या गौरवासाठी आपले सर्वोच्च बलिदान देणारे 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा ३५० वा शहीदी समागम सोहळा येत्या २४ व २५ जानेवारी रोजी नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे. या ऐतिहासिक सोहळ्यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहणार असून, त्यांच्या सोयीसुविधा आणि नियोजनाचा आढावा जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज एका विशेष बैठकीत घेतला.या शहीदी समागम सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे यात शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, भगत नामदेव आणि उदासीन अशा नऊ विविध समाज-संप्रदायांचे भाविक एकत्र येणार आहेत. गुरु तेग बहादूर यांचा त्याग, बलिदान आणि त्यांनी मानवतेसाठी दिलेला लढा यांचा इतिहास देश-विदेशात पोहोचवणे हा या आयोजनामागचा मुख्य उद्देश आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या बैठकीत निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपायुक्त लखिचंद चव्हाण यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी आणि गुरुद्वारा संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी खालील महत्त्वाचे निर्देश दिले:

**समन्वय समितीः** महानगरपालिका, पोलीस यंत्रणा, शिक्षण आणि परिवहन विभागाने समन्वयाने काम करून भाविकांना सर्व सुविधा पुरवाव्यात.

**वाहतूक व सुरक्षाः** जिल्ह्यातून नांदेडकडे जाणाऱ्या भाविकांच्या वाहनांची रीतसर नोंद घ्यावी. नांदेड येथील वाहनतळ आणि वाहतूक व्यवस्थेबाबत भाविकांना आगाऊ माहिती द्यावी.

**जनजागृतीः** शाळा, महाविद्यालयांनी दैनंदिन उपक्रमांच्या माध्यमातून गुरु तेग बहादूर यांचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावा.

**सहभागाचे आवाहनः** या सोहळ्यात केवळ विशिष्ट समाजापुरते मर्यादित न राहता सर्व समाजातील नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

कार्यक्रमाला जाणाऱ्या भाविकांच्या सुलभ प्रवासासाठी आणि माहितीसाठी https://gurutegbahadurshahidi.com हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. यावर रस्ते, रेल्वे, बस सेवा आणि कार्यक्रमाच्या स्थळाची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.या बैठकीस जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, अन्न निरीक्षक वर्षा रोडे यांच्यासह नंदकुमार अहुजा, गुरुज्ञान सिद्ध रणवीरसिंह, नरेंद्रसिंग जबिंदा, हरिंदरसिंग, जगदेव सिंग, रमेश वधवा, उत्तम चव्हाण, डॉ. सुदाम चव्हाण, करतार राठोड, कुलदीपसिंग छाबडा, सरदार हरिसिंग आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

## निवडणूक खर्चाचा हिशोब ३० दिवसांत सादर करा: आयुक्त जी. श्रीकांत यांचे निर्देश

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आलेल्या सर्व नगरसेवकांनी त्यांच्या प्रचारासाठी झालेल्या एकूण खर्चाचा तपशील ३० दिवसांच्या आत निवडणूक आयोगाकडे सादर करणे अनिवार्य आहे. विहित मुदतीत खर्चाचा हिशोब सादर न केल्यास संबंधित सदस्याची सदस्यता रद्द होऊ शकते, असा इशारा महानगरपालिका आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिला आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अंतर्गत दिनांक १५ जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडली असून १६ जानेवारी रोजी निकाल जाहीर करण्यात आले. या निवडणुकीत सहभागी झालेल्या प्रत्येक उमेदवाराने निवडणूक प्रचारासाठी केलेल्या खर्चाचा तपशील नियमानुसार सादर करणे बंधनकारक आहे.

या अनुषंगाने आज झालेल्या विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीत आयुक्त जी. श्रीकांत यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. उमेदवारांना खर्चाचा हिशोब सादर करण्याबाबत वेळोवेळी सूचना देण्यात याव्यात तसेच नियमानुसार तपासणी व नोंद ठेवण्याची कार्यवाही काटेकोरपणे राबवावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी आणि कायद्याचे काटेकोर पालन सुनिश्चित करण्यासाठी हा खर्चाचा हिशोब सादर करणे अत्यंत महत्त्वाचे असून सर्व निवडून आलेल्या सदस्यांनी याची गांभीर्याने दखल घ्यावी, असे आवाहनही आयुक्तांनी यावेळी केले.

## 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमासाठी नांदेड सज्ज

**आत्ताच एक्सप्रेस**

**लातूर/प्रतिनिधी/** नांदेड नगरी एका ऐतिहासिक सोहळ्यासाठी सज्ज होत आहे. शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचा ३५० वा 'शहीदी समागम' हा भव्य कार्यक्रम २४ आणि २५ जानेवारीला पार पडणार आहे. त्यासाठी प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. देश-विदेशातून सुमारे १० लाख भाविक या सोहळ्यासाठी नांदेडमध्ये दाखल होण्याची शक्यता असल्याचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी सांगितले.

**सूक्ष्म नियोजन आणि विविध समित्या**

कार्यक्रमाच्या दृष्टीने प्रशासनाने सूक्ष्म नियोजन केले आहे. भाविकांच्या सोयीसाठी विविध समित्या स्थापन केल्या आहेत. यात बुटांच्या व्यवस्थेपासून ते भोजनापर्यंतच्या जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले आहे. भाविकांसाठी ८ ठिकाणी अखंड 'लंगर' (महाप्रसाद) सुरू राहतील. तसेच, त्यांच्या निवासाचीही उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. कार्यक्रम ठिकाणी आरोग्य शिबिरे उभारण्यात आली आहेत.

यासोबतच शासकीय योजनांचे आणि विविध उद्योजकांचे स्टॉल्सही उपलब्ध असतील.

या सोहळ्याला अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर राज्यांचे मुख्यमंत्रीही नांदेडमध्ये येतील. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीनेही कडेकोट तयारी करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाचा अल्पसंख्याक विभाग या कार्यक्रमासाठी 'नोडल एजन्सी' म्हणून काम पाहत आहे. हा कार्यक्रम एका समाजापुरता मर्यादित नाही. यात लबाना, बंजारा, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल आदींसह आणि इतर सर्व समुदायांचे लोक मोठ्याप्रमाणात सहभागी होत आहेत.

**जनतेचे योगदान महत्त्वाचे**

आजच्या धावपळीच्या जगात 'त्याग आणि सेवा' हीच खरी माणुसकी आहे. हा विचार जपण्याची ही सुवर्णसंधी आहे. त्यामुळे मराठवाडा आणि महाराष्ट्रातील जनतेसह देशभरातील जनतेने या ऐतिहासिक सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले आहे. ज्यांना या महायज्ञात सेवा (स्वयंसेवक म्हणून) द्यायची आहे, त्यांनी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी नमूद केले.

## अक्षय कुमार वाहन अपघात प्रकरण; मर्सिडीज चालक ताब्यात, मध्यरात्री नेमकं काय घडलं?



**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/** सिनेसृष्टीतून खळबळ उडवणारी बातमी समोर येत आहे. शूटिंगवरून परतत असताना अभिनेता अक्षय कुमारच्या वाहनाचा भीषण अपघात झाला. विमानतळावरून जुहू येथील घरी जात असताना आलिशान मर्सिडीजने रिक्षाला धडक दिली. यात अक्षय कुमारच्या सुरक्षेसाठी असलेल्या वाहनाचेही नुकसान झाले. या भीषण अपघातात रिक्षाचा चुराडा झाला. तर, चालकाची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. या भीषण अपघातानंतर प्रत्यक्षदर्शींनी धाव घेत ऑटो चालकाला तातडीने रूग्णालयात नेले. तसेच जुहू पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपासाला सुरूवात केली. दरम्यान, या अपघाताच्या घटनेबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. जुहू पोलिसांनी मर्सिडीज कार चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तसेच त्याला ताब्यात घेऊन पोलिसांनी चौकशीला सुरूवात केली आहे.

**अपघात नेमका कसा घडला? :** या भीषण अपघाताची घटना जुहू येथील थिंक जिमजवळ २० जानेवारी रोजी मध्यरात्री घडली. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, अक्षय कुमार शूटिंगवरून जुहू येथील घरी जाण्यासाठी परतत होता. अक्षय कुमार उपस्थित असलेल्या कारच्या मागे सुरक्षेसाठी एस्कॉर्ट SUV जात होती. SUVच्या मागे बासित खान नावाचा तरूण ऑटो रिक्षा चालवत होता. दरम्यान, ऑटो रिक्षाच्या मागून एक भरधाव मर्सिडिज येत होती. भरधाव मर्सिडिजने ऑटो रिक्षाला जोरदार धडक दिली. ऑटो रिक्षाचा पुढचा भाग थेट डणतच्या मागच्या साईडला जाऊन धडकली. या भीषण अपघातात रिक्षाचा अक्षरशः चुराडा झाला. तर, डणतचा मागचा भाग उचलला गेला. या भीषण अपघातात रिक्षा चालक गंभीर जखमी झाला. प्रत्यक्षदर्शींनी तातडीने घटनास्थळी धाव घेत रिक्षा चालकाला बाहेर काढले. अपघात घडल्यानंतर अक्षय कुमार देखील आपल्या वाहनातून बाहेर आला. मात्र, सुरक्षेच्या कारणास्तव त्याच्या टीमने त्याला सुरक्षितस्थळी नेले. अपघाताची माहिती मिळताच जुहू पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच तपास सुरू केला. मिळालेल्या माहितीनुसार, श्री श्री रविशंकर महाराज यांच्या वाहनामुळे अपघात घडला असल्याची माहिती आहे.

## मला नोकरीची गरज नाही मी गंमत म्हणून...; भूमी अभिलेख अधिकाऱ्याचा व्हिडिओ व्हायरल



**आत्ताच एक्सप्रेस**

**इंदापूर/प्रतिनिधी/** इंदापूर येथील भूमी अभिलेख कार्यालयातील एका अधिकाऱ्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. संबंधित अधिकारी पुढील व्यक्तीसोबत अरेरावीची, अवमानकारक आणि वादग्रस्त भाषा वापरताना कॅमेऱ्यात कैद झाले आहेत. व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये अधिकारी स्वतःची आर्थिक व सामाजिक ताकद सांगत दबाव टाकताना दिसत आहेत. माझ्याकडे भरपूर जमीन आहे. मी खानदानी मोठा आहे. पैसा पाण्याने भरपूर आहे. दहा-वीस लाख रुपये टाकून मोकळा होतो अशा प्रकारची वक्तव्ये करत ते आपली संपत्ती आणि पैशांची ताकद मिरवत असल्याचे ऐकू येते.

तसेच ७५ एकर बागायत जमीन आहे... ऊस, बागायत सगळं आहे... मी पगारी नोकरीसाठी काम करत नाही, हौसेने काम करतो.. याचबरोबर माझ्या बापाला पावणेदोन लाख रुपये पेन्शन आहे... साहेबांना कॉन्टॅक्ट केला म्हणजे आम्ही घाबरत नाही... माझ्या विरोधात काय करायचं ते करा अशा धमकीवजा वक्तव्यांमुळे शासकीय अधिकाऱ्यांच्या वर्तनावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या संपूर्ण प्रकारामुळे भूमी अभिलेख कार्यालयातील कामकाजाची पद्धत, अधिकाऱ्यांची भाषा आणि सामान्य नागरिकांशी होणारी वागणूक यावर तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून, संबंधित अधिकाऱ्यावर वरिष्ठ पातळीवरून चौकशी व कारवाई होते का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. इंदापूर येथील भूमी अभिलेख कार्यालयातील एका अधिकाऱ्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

इंदापूर येथील भूमी अभिलेख कार्यालयातील एका अधिकाऱ्याचा हा व्हिडिओ आहे. ते व्हिडीओमध्ये संबंधित व्यक्तीला म्हणतात, मी गंमत म्हणून काम करतो आहे, माझी घरी सतरा एकर केळी आणि सतरा एकर उस आहे, डायरेक्ट साहेबांना भेटलं म्हणून काम होत नाहीत. आलं का लक्षात, आतमध्ये भेटा आणि काय झालं ते विचारा. साहेबाला पाठवलं किंवा कुठे पाठवलं तर मी घाबरणारा नाहीये, मी पळसदेवचा आहे, मला नोकरीची गरज नाही.

## यशस्वी होण्यासाठी निरंतर वाचन काळाची गरज - कुंडलिकराव अतकरे

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी केवळ अभ्यासक्रम नाही, तर निरंतर अवांतर वाचन करणे आवश्यक आहे. शासकीय विभागीय ग्रंथालयातील ग्रंथांचे समृद्ध दालन सर्वांसाठी खुले असून, नागरिकांनी आणि विद्यार्थ्यांनी या ज्ञानाच्या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन मराठी प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष कुंडलिकराव अतकरे यांनी केले.मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त समर्थनगर येथील शासकीय विभागीय ग्रंथालयात आयोजित 'ग्रंथप्रदर्शना'च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

मातृभाषेतून व्यक्त होणे नैसर्गिक

कार्यक्रमाचे अध्यक्ष, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांनी मातृभाषेचे महत्त्व विशद करताना सांगितले की, मातृभाषेचा संस्कार व्यक्तीच्या अंतःकरणात खोलवर रुजलेला असतो. आनंद असो वा दुःख, तीव्र भावना अनुभवताना मानवाच्या मुखातून बाहेर पडणारे उद्गार हे नेहमी मातृभाषेतूनच येतात.

आपला मराठी शब्दसाठा वाढवण्यासाठी विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त मराठी ग्रंथांचे वाचन करावे.या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून खालील मान्यवर उपस्थित होते.गुलाबराव मगर (कार्यवाह, जिल्हा ग्रंथालय संघ),सुभाष साबळे (जिल्हा ग्रंथालय अधिकारी),श्रीमती वनिता निकम (मुख्याध्यापिका, देवगिरी कन्या विद्यालय),जीवन कुलकर्णी, कोलते (शिक्षक, देवगिरी हायस्कूल),कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांनी केले. त्यांनी ग्रंथालयाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तांत्रिक सहाय्यक गोविंद खेडकर यांनी सूत्रसंचालन केले व उपस्थितांचे आभार मानले. या प्रसंगी शिक्षक, विद्यार्थी, ग्रंथालयाचे सभासद आणि वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी सामूहिक ग्रंथ वाचन करून वाचन संस्कृतीचा जागर केला.



**२८ जानेवारीपर्यंत प्रदर्शन खुले**

हे ग्रंथप्रदर्शन दिनांक २८ जानेवारीपर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत सर्व नागरिकांसाठी खुले राहणार आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी आणि शासकीय विभागीय ग्रंथालयाचे सभासद होऊन येथील वाचन सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांनी केले आहे.

## जालना शहराची उर्वरित विकासकामे पूर्ण करणारः नवनिर्वाचित नगरसेवक भास्कर आबा दानवे यांचा निर्धार

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १ मधून भारतीय जनता पक्षाचे नवनिर्वाचित नगरसेवक आणि जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्यासह त्यांच्या संपूर्ण पॅनेलने मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला. या विजयानिमित्त शिक्षक कॉलनी परिसरातील नागरिकांच्या वतीने सर्व विजयी उमेदवारांचा भव्य नागरी सत्कार सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.यावेळी सत्काराला उत्तर देताना भास्कर आबा दानवे म्हणाले की, जनतेने दिलेला हा विजय केवळ सन्मान नसून, आमच्यावर टाकलेली मोठी जबाबदारी आहे. निवडणूक प्रचारात दिलेले प्रत्येक आश्वासन आम्ही प्रत्यक्ष कृतीत उतरवू.पूर परिस्थितीवर कायमस्वरूपी तोडगा: मागील काळात अतिवृष्टीमुळे शिक्षक कॉलनीतील घरांचे मोठे नुकसान झाले होते. भविष्यात हे टाळण्यासाठी पावसाच्या पाण्याचे योग्य 'डायव्हर्जन' करून ते सीना व कुंडलिका नदीत सोडण्याची कायमस्वरूपी व्यवस्था केली जाईल.शुद्ध पाणीपुरवठा: दूषित पाण्याची समस्या सोडवण्यासाठी पाइपलाइनची तातडीने तपासणी व तांत्रिक सुधारणा करून नागरिकांना स्वच्छ पाणी देण्याची ग्वाही त्यांनी दिली.प्रभागातील रस्ते, ड्रेनेज आणि इतर सर्व प्रलंबित विकासकामे टप्प्याटप्प्याने आणि प्राधान्याने पूर्ण करण्यात येतील.यावेळी सौ. सुशीला दानवे, सौ. ज्योती सले, सौ. पद्मा मानधनी आणि कल्याण भदनेकर या नवनिर्वाचित नगरसेवकांसह जीवन सले, अमोल कारंजेकर, भगवान नाना आनंदे व शिक्षक कॉलनीतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेकटा येथे ग्रामीण स्तर एक गाव एक संघ टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धाचे उद्घाटन गवांदे महाराज यांच्या हस्ते करण्यात आले

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी.फिरोज मन्सुरी/** गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथून जवळच असलेल्या शेकटा येथे खा, लोकनेते संदिपान भुमरे मित्र मंडळ आयोजित ग्रामीण स्तर एक गाव एक संघ टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान खा. लोकनेते संदीपान भुमरे मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष किशोर चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेली स्पर्धा सोमवार दि १९ जानेवारी रोजी पासून सुरू होणार आहे.स्पर्धेचे उद्घाटन ह भ प कडूबाळ महाराज गवादे यांच्या हस्ते संपन्न झाला यावेळी शिवसेनेचे जिल्हा समन्वयक बाळासाहेब चव्हाण, किशोर चव्हाण, अल्पसंख्याक जिल्हाप्रमुख बादशहा पटेल, सुनील पोळ, महेंद्र गंडे पोपटराव चव्हाण राहुल चव्हाण प्रदीप चव्हाण यांच्यासह शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.



स्पर्धा विजयी संघास प्रथम पारितोषिक ५१००० हजार, द्वितीय ३१००० हजार, तृतीय ११००० हजार, ५१०० हजार शंभर रुपयांचे चौथे पारितोषिक असणार आहे. स्पर्धा यशस्वीतेसाठी नारायण राजपूत अवेश शेख तसेच किशोर चव्हाण मित्र मंडळ परिश्रम घेत आहे..

**स्पर्धेचे नियम व अटी**

स्पर्धेमध्ये वेळेला महत्व असेल, स्पर्धा ही एक गाव एक संघ अशी खेळवण्यात येईल, पंचांचा निर्णय अंतिम राहील, स्पर्धेमध्ये फेर बदल करण्याचा अधिकार खा संदिपान भुमरे मित्र मंडळाकडे राहील, गैरवर्तन आढळून आल्यास संघ बाद करण्यात येईल, येणाऱ्या संघांना प्रवेश दिला जाईल, स्पर्धेसाठी आधारकार्ड असणे बंधनकारक राहील, ही स्पर्धा साखळी पद्धतीने खेळविण्यात येईल, स्पर्धेसाठी स्पर्धकांनी आपली नाव नोंदणी प्रवेश फी देऊन करावी, ही स्पर्धा लॉट्स टाकून साखळी (लीग) पध्दतीने खेळविण्यात येईल.

## गंगापूर शहरातील मुख्य रस्त्यावरील डिव्हायडर मध्ये वाढलेल्या झाडांची साफसफाई करण्यास सुरुवात

### दैनिक आत्ताच एक्सप्रेस बातमी चा दणका

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी /सुभान शहा/** गंगापूर शहरातील वैजापूर गंगापूर मुख्य रस्त्याच्या डिवायडर मध्ये धोकादायक झाडे हटविण्याची बातमी प्रसिद्ध करताच प्रशासनाकडून साफसफाईला सुरुवात. झाडांच्या फांद्या अपघाताला कारणीभूत ठरत असून, रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा ठरत होते.या झाडांच्या फांद्या आणि धोकादायक झाडे संबंधित विभागाकडे काढण्याची मागणी होत होती. सर्वाधिक वाहतूक या रस्त्यावरून होत असते, त्यामुळे हा रस्ता धोकादायक बनला होता. बहुतांश ठिकाणी दाट झाडे होते. काही ठिकाणी बाबळीचे झाडे त्यांच्या फांद्या रस्त्यावर लोंबकळत होती, याशिवाय काही झाडे रस्त्याच्या अगदीच जवळ होते. अशा झाडांमुळे मोठे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती



एखादा अपघात झाल्यानंतरच संबंधित विभागाला जाग येणार का? असा सवाल विचारला जात होता.




दैनिक आत्ताच एक्सप्रेस ला बातमी प्रसिद्ध करताच प्रशासनाकडून कारवाईला सुरुवात झाली आहे. तसेच मुख्य रस्त्यावरील डिव्हायडर मध्ये इस्टेट लाईटचे पोल उभारण्यात आलेले आहे. परंतु हे पोल फक्त शोभेची वस्तू बनली आहे. काही पोलवरचे लाईट अनेक दिवसापासून बत्ती गुल झालेली आहे. परंतु संबंधित विभागाचे याकडे लक्ष नसल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो यामुळे नागरिकांनी मोठी नाराजी व्यक्त केली आहे. तसेच रात्रीच्या वेळेस वाहनाची मोठी वर्दळ असते सध्या उसाचा हंगाम सुरू आहे. ट्रॅक्टर वर ऊस वाहतूक केली जात आहे. परंतु अंधारात काही वाहन धारकांना वाहनाचा अंदाज येत नसल्याने अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुख्य रस्त्यावरील पोलवरचे लाईट तात्काळ दुरुस्त करून चालू करण्यात यावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे

# भोगगाव येथे ४० एकर ऊस जाळून शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले

## वंचित बहुजन आघाडी आक्रमक, दोषींवर कठोर कारवाईची मागणी!





**आत्ताच एक्सप्रेस**

**घनसावंगी (प्रतिनिधी)** तालुक्यातील मोजे भोगगाव येथे एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. येथील बौद्ध आणि कहार समाजाच्या गरीब शेतकऱ्यांच्या तब्बल ४० एकर ऊस अज्ञातांनी जाळून खाक केला आहे. हाता तोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी उघड्यावर पडला असून, या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

घटनेची माहिती मिळताच वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी धाव घेत जळालेल्या उसाची पाहणी केली आणि पीडित शेतकऱ्यांशी संवाद साधला.

भोगगाव येथील अल्पभूधारक बौद्ध आणि कहार समाजातील शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने उसाचे पीक उभे केले होते. मात्र, समाजकंटकांनी किंवा शॉर्ट सर्किटच्या नावाखाली (तपास प्रलंबित) या ४० एकर उसाला आग लावली. बघता बघता आगीने रौद्र रूप धारण केले आणि शेतकऱ्यांच्या वर्षभराच्या मेहनतीची राख झाली. यात लाखो रुपयांचे नुकसान झाले असून शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे पूर्णपणे मोडले आहे.

**वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी मैदानात :** या घटनेचा पंचनामा करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा व तालुका पातळीवरील नेते घटनास्थळी दाखल झाले. यावेळी त्यांनी प्रशासनाच्या संथ कारभारावर कडाडून टीका केली. पाहणी दौऱ्यात खालील पदाधिकारी उपस्थित होते.

रामप्रसाद थोरात , परमेश्वर खरात, चोखा नाना सौंदर्य, जमीर शेख, समाधान तोडके, बाबासाहेब गलफडे, बाबासाहेब सोनवणे, आक्रमक पवित्रा आणि मागण्या पाहणी दरम्यान रामप्रसाद थोरात सर यांनी प्रशासनाला इशारा दिला की, हा केवळ ऊस जळालेला नाही, तर गरीब दलित आणि मागासवर्गीय शेतकऱ्यांची चूल विझवण्याचा प्रयत्न झाला आहे. जर प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई दिली नाही, तर वंचित बहुजन आघाडी तीव्र आंदोलन छेडेल.

१. शासनाने तातडीने हेक्टरी भरीव मदत जाहीर करावी. २. संबंधित साखर कारखान्याने हा जळालेला ऊस प्राधान्याने गाळपासाठी घेऊन शेतकऱ्यांना पूर्ण भाव द्यावा. ३. ही आग लावली गेली असल्यास, दोषींचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक गुन्हे दाखल करावेत.यावेळी बाधित शेतकऱ्यांच्या डोळ्यातील पाणी पाहून उपस्थित पदाधिकाऱ्यांनी हळहळ व्यक्त केली. आम्ही या अन्यायाविरुद्ध शेवटपर्यंत लढू, असा विश्वास वंचितच्या नेत्यांनी शेतकऱ्यांना दिला आहे.बाधित शेतकऱ्यांची आर्त हाक: मुलाबाळांच्या लग्नासाठी आणि कर्जासाठी हा ऊस लावला होता, आता आम्ही जगायचे कसे? असा सवाल हताश शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. आता या प्रकरणावर प्रशासन आणि पोलीस काय भूमिका घेतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## संक्षिप्त

### काऱ्हाळा येथील भगवान सोळंके यांची तलाठी पदी तर आशिष शेळके याची केंद्रीय राखील दल पोलीस पदी निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**आष्टी/प्रतिनिधी**/ नुकत्याच पार पडलेले केंद्रीय राखीव दल भरती परीक्षा व तलाठी पदासाठी पार पडलेले परीक्षेत परतूर तालुक्यातील काऱ्हाळा येथील सर्व सामान्य शेतकरी कुटुंबातील भगवान सोळंके व आशिष शेळके यांची निवड झाली आहे. या निवडीबद्दल गावातील ग्रामस्थ यांनी त्यांची वाजत गाजत मिरवणुक काढून मोठ्या दिमाखात भव्य सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले. यावेळी गावातील नागरिक मित्र परिवार यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती या प्रसंगी तलाठी पदावर रुजू झालेले भगवान सोळंके यांनी मनोगत व्यक्त करत उपस्थित गावकऱ्यांना शिक्षण आणि अभ्यासाचे महत्व सांगत केल्याने होत आहे ते आधी केलेची पाहिजे या प्रमाणे त्यांनी सतत सातत्य ठेवत अभ्यास केला अभ्यासाशिवाय पर्याय नसून, पालकांनी आपल्या मुलावर लक्ष द्याव मोबाईल हातात न देता त्याच्या शिक्षणावर लक्ष द्यावे त्यातूनच आपली प्रगती होऊ शकते. यावेळी उठत्रझ मध्ये निवड झालेल्या आशिष शेळके यांनी तरुणांनी CRPF, BSF, कडे वळण्याचा सल्ला दिला यावेळी त्याने कशा प्रकारे नियोजन करून अभ्यास केला या बद्दल माहिती दिली या प्रसंगी आशिष यांचे त्यांच्या वडिल रमेश शेळके यांचा ही गावातील नागरिकांनी हार तुरे हस्तांदोलन करत स्वागत केले. व गावाचे नाव देशपातीवर नेल्याने त्याचे अनेकांनी आपली मनोगत व्यक्त करत स्वागत करून त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी गावकऱ्यांची व तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा; जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे आदेश

जालना: अंमली पदार्थांचे सेवन केवळ व्यक्तीच्या शरीरावर आणि मनावरच नव्हे, तर संपूर्ण समाजावर घातक परिणाम करते. ही सामाजिक कीड मुळापासून उपटून टाकण्यासाठी जिल्ह्यातील सर्व विभागांनी सतर्क राहून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित 'जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समिती' च्या बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी आर.डी. निकाळजे, अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त जीवन जाधव, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या आश्विनी म्हस्के यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.जिल्हाधिकाऱ्यांनी औषध विक्रेत्यांना कडक इशारा दिला आहे. अनेकदा बंदी असलेल्या औषधांमधील घटकांचा वापर अमली पदार्थ म्हणून केला जातो.त्यामुळे डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधांची विक्री होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. औषध प्रशासनाने मेडिकल स्टोअर्सची नियमित तपासणी करावी, तसेच टपाल विभागाने संशयास्पद पार्सलची कसून तपासणी करावी, असेही त्यांनी सांगितले.युवा पिढीला या व्यसनापासून वाचवण्यासाठी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये व्यापक जनजागृती मोहीम राबवण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. केवळ शहरातच नव्हे, तर ग्रामीण भागातही याचे दुष्परिणाम पोहोचवणे गरजेचे आहे.जिल्ह्यात खसखस किंवा गांजा यांसारख्या पिकांची अवैध लागवड होणार नाही,याची जबाबदारी कृषी सहायक आणि पोलीस पाटील यांच्यावर सोपवण्यात आली आहे. अशा प्रकारची लागवड आढळल्यास तात्काळ गुन्हे दाखल करण्याचे आदेशही यावेळी देण्यात आले.

# अंबड तालुक्यातील भ.जळगाव येथे भक्तीचा जागर

**पोलीस जमादार योगेश गायके महाराजांनी किर्तनातून मांडला 'सारासार विचारां'चा संदेश**



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/जिल्हा प्रतिनिधी . गणेश सपकाळ**/ अंबड तालुक्यातील भ.जळगाव येथील प्रसिद्ध देवस्थान माळावरचा गणपती येथे आयोजित १७ व्या अखंड हरिनाम सप्ताहात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून,तिर्थपुरी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस जमादार योगेश गायके महाराज यांच्या किर्तनाने भाविक मंत्रमुग्ध झाले. जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या सारासार विचार करा उठाउठी या अभंगावर आधारित निरूपण करत महाराजांनी आजच्या धावपळीच्या व तणावपूर्ण जीवनात माणसाने विवेकबुद्धी जागृत ठेवण्याचा संदेश दिला. कर्तव्य बजावत असतानाही अध्यात्माची कास धरलेल्या खाकी वर्दीतील या किर्तनकाराने समाजाला जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन दिला. जीवनात कितीही संकटे आली तरी विठ्ठलाच्या नामस्मरणाने ती दूर होतात,संसाराचा हा कठीण भवसागर पार करण्यासाठी नामाशिवाय दुसरा मार्ग नाही,असे प्रतिपादन त्यांनी केले.जशी पोलीस दलात शिस्त महत्त्वाची असते,तशीच भक्तीच्या मार्गातही नामस्मरणाचा नेम आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भक्तीमध्ये जात-पात वा कुळाचे बंधन नसून जो कोणी मनोभावे राम-कृष्ण-हरी नामाचा जप करतो, त्याच्या कोटी कुळांचा उद्धार होतो,असा मोलाचा संदेश त्यांनी भाविकांना दिला.गेल्या १७ वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेल्या या हरिनाम सप्ताहामुळे माळावरच्या गणपती परिसरात भक्तीचे वातावरण पसरले असून,एका पोलीस कर्मचाऱ्याच्या मुखातून अध्यात्माची रसाळ वाणी ऐकण्यासाठी भ.जळगाव व परिसरातील भाविकांनी मोठी गर्दी केली होती.सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी ग्रामस्थ व उत्सव समितीचे पदाधिकारी विशेष परिश्रम घेत असून, या किर्तन सोहळ्यामुळे संपूर्ण परिसरात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

# कुंभार पिंपळगावात १०० कोटींचे 'प्लॉटिंग' रॅकेट! प्रशासनाचे 'चौकशीचे आदेश' निव्वळ धूळफेक की खरी कारवाई?

**आत्ताच एक्सप्रेस**

**कुंभार पिंपळगाव/प्रतिनिधी**/ कुंभार पिंपळगाव परिसरात सध्या भूमाफियांच्या मनमानीने थैमान घातले असून, तब्बल १०० कोटी रुपयांचे बेकायदेशीर प्लॉटिंग गाजतेय. या महाघोटाळ्याबाबत आता प्रशासनाने चौकशीचे आदेश दिले खरे, पण ही फक्त जनतेच्या डोळ्यात धूळफेक आहे की खरोखरच गुन्हेगारांना तुरुंगाची हवा दाखवली जाणार, असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत.

**आमचे काही रोकठोक सवाल:** प्रशासन इतके दिवस झोपले होते का? १०० कोटींचा व्यवहार डोळ्यासमोर होत असताना महसूल विभागाला याचा सुगावा कसा लागला नाही?

बड्या धेंड्यांचे वरदहस्त? या बेकायदेशीर व्यवसायामागे नक्की कोणत्या राजकीय नेत्यांचे किंवा बड्या अधिकार्यांचे आशीर्वाद आहेत?

केवळ चौकशीचा फार्स कशासाठी? आदेश तर निघाले, पण अद्याप एकावरही गुन्हा दाखल का झाला नाही? की दोषींना पळवाटा शोधून देण्यासाठी वेळ दिला जात आहे?

> **काय आहे नेमकं प्रकरण?**
>
> शासकीय नियमांना केराची टोपली दाखवत, कोणतीही रीतसर परवानगी न घेता कुंभार पिंपळगावात कोट्यवधींचे प्लॉट पाडले गेले आहेत. यात फक्त पैशांचा खेळ नसून सर्वसामान्यांची फसवणूक करण्याचा मोठा डाव आखला गेल्याचे स्पष्ट दिसत आहे.

**जनतेची मागणी: आता थेट कारवाई हवी! :** नुसत्या कागदी घोड्यांनी जनतेचे समाधान होणार नाही. ज्यांनी नियमांचे उल्लंघन करून कोट्यवधींची माया जमवली आहे, त्यांच्या मुसक्या आवळणे गरजेचे आहे. जर प्रशासनाने यात कुचराई केली किंवा दोषींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला, तर हे प्रकरण राज्यस्तरावर नेऊन मोठे जनआंदोलन छेडण्याचा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे.

प्रशासनाने तात्काळ पंचनामा करून अनधिकृत बांधकामांवर बुलडोझर चालवावा आणि मुख्य सूत्रधारांना बेड्या ठोकाव्यात, हीच कुंभार पिंपळगावकरांची अपेक्षा आहे.

# विकासकामांना गती द्या, नागरिकांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण करा- जिल्हाधिकारी आशिमा मित्तल


**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना(प्रतिनिधी)**जिल्ह्यातील नागरी सुविधांचा दर्जा सुधारण्यासाठी आणि प्रलंबित विकासकामांना गती देण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी कंबर कसली आहे. जिल्ह्यातील सर्व नगर परिषद व नगर पंचायतींच्या मुख्याधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली.

**मुख्याधिकाऱ्यांना निर्देश**

यावेळी त्यांनी प्रलंबित तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्याचे आणि महसूल वसुलीसाठी विशेष मोहीम राबविण्याचे कडक निर्देश दिले.स्वच्छता आणि पायाभूत सुविधांवर भरबैठकीत शहर स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन आणि सांडपाणी व्यवस्थेवर सखोल चर्चा करण्यात आली. शहरांमधील पाणीपुरवठा योजना, रस्त्यांची कामे आणि पथदिव्यांची स्थिती यांचा आढावा घेत जिल्हाधिकाऱ्यांनी कामांचा प्रगती अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. नागरिकांना मूलभूत सुविधा वेळेत आणि दर्जेदार मिळाव्यात यासाठी मुख्याधिकाऱ्यांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे त्यांनी स्पष्ट केले.भटकी जनावरे आणि होर्डिंग्सबाबत धोरणात्मक निर्णयशहरांतील वाढत्या समस्यांकडे लक्ष वेधत जिल्हाधिकाऱ्यांनी खालील महत्त्वाचे निर्देश दिले:कोंडवाडे व निवारा केंद्रे: रस्त्यावर मोकाट फिरणाऱ्या जनावरांसाठी तातडीने कोंडवाडे उभारणे आणि भटक्या श्वानांसाठी निवारा केंद्रे स्थापन करणे. होर्डिंग्स धोरण: नगर परिषद व नगर पंचायत हद्दीतील अधिकृत/अनधिकृत होर्डिंग्सबाबत ठोस धोरणात्मक निर्णय घेणे.वसुली मोहीम: मालमत्ता कर आणि इतर थकीत महसूल वसुलीसाठी विशेष मोहीम राबवून नगर पालिकेचे उत्पन्न वाढवणे.प्रधानमंत्री आवास योजनेचा आढावाजिल्ह्यात घरकुल योजनेचे काम समाधानकारक असले तरी उर्वरित कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

बैठकीत सादर करण्यात आलेली आकडेवारी खालीलप्रमाणे आहे:योजना तपशील (PMAY 1.0) संख्याएकूण मंजूर घरकुले ७,५३१ पूर्ण झालेली घरकुले ५,४०९ प्रगतीपथावर असलेली बांधकामे १,७७९ यासोबतच प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.०, नगरोत्थान योजना, आणि दलित व इतर वस्ती सुधार योजनांच्या अंमलबजावणीबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली.



आधुनिक तंत्रज्ञानाचा वापरघनकचरा व्यवस्थापनासाठी केवळ पारंपरिक पद्धतीवर अवलंबून न राहता, ICT (Information and Communication Technology) आधारित स्कॅनिंग प्रणालीचा वापर करून कचरा संकलनावर देखरेख ठेवण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

या बैठकीस नगर पालिका प्रशासनाचे सहआयुक्त गवळी, जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी आणि संबंधित विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जालन्यात उघडी मॅनहोल्स ठरताहेत 'डेथ ट्रॅप'

## प्रशासकीय अनास्थेविरोधात ड. महेश धनावत यांचा संताप

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/ शहरातील रस्त्यांवर पसरलेली उघडी आणि धोकादायक मॅनहोल्स सध्या मृत्यूचे सापळे बनली असून, जालना महानगरपालिका प्रशासनाच्या 'धृतराष्ट्र' भूमिकेमुळे सामान्य नागरिकांचा जीव टांगणीला लागला आहे. सुरक्षित रस्ते हा आमचा घटनात्मक अधिकार आहे, तो कोणाच्या मेहेरबानीवर अवलंबून नाही, अशा शब्दांत नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश धनावत यांनी प्रशासकीय निष्काळजीपणाचे वाभाडे काढले आहेत.

**प्रशासनाचे 'अक्षम्य' दुर्लक्ष, जनतेचा जीव धोक्यात :** शहरातील मुख्य चौक असोत वा गल्ली-बोळातील रस्ते, ठिकठिकाणी मॅनहोलची झाकणे एकतर तुटलेली आहेत किंवा रस्त्याच्या पातळीपेक्षा अवाजवी उंच किंवा खोल आहेत. ड. धनावत यांनी आक्रमक पवित्रा घेत म्हटले की, प्रशासनाच्या या अक्षम्य दुर्लक्षामुळे रोज छोटे-मोठे अपघात होत आहेत. रात्रीच्या वेळी तर हे मॅनहोल्स म्हणजे साक्षात यमदूतच ठरत आहेत. एखादा बळी गेल्यावरच प्रशासनाला जाग येणार का?

**संविधानाचा दाखला: हा तर 'कलम २१' चा भंग! :** केवळ टीका न करता ड. धनावत यांनी या समस्येला कायदेशीर पैलू जोडला आहे. त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निकालाचा संदर्भ देत स्पष्ट केले की: भारतीय संविधानाच्या कलम २१ नुसार, सुरक्षित रस्त्यांचा अधिकार हा 'जगण्याच्या अधिकारा'चा अविभाज्य भाग आहे. खड्डेमुक्त आणि सुरक्षित रस्ते देणे ही पालिकेची घटनात्मक जबाबदारी आहे. प्रशासनाच्या चुकीमुळे अपघात झाल्यास, संबंधित प्राधिकरणाला नुकसान भरपाई देणे बंधनकारक आहे.

> **'नागरिकांचा जीव जाण्याची वाट पाहताय का?' लोकप्रतिनिधींच्या भूमिकेवरही उपस्थित केले सवाल; उच्च न्यायालयाच्या निकालाचा दिला हवाला**

**लोकप्रतिनिधींनो, आता तरी एसी गाड्यांतून खाली उतरा! :** प्रशासनासोबतच शहरातील लोकप्रतिनिधींनाही ड. धनावत यांनी धारेवर धरले आहे. केवळ निवडणुकीपुरते मते मागायला येऊ नका. नागरिकांनी तुम्हाला विश्वासाने निवडून दिले आहे. आपापल्या प्रभागातील मृत्यूचे सापळे बुजवण्यासाठी पालिका प्रशासनाच्या मानेवर बसून काम करून घेणे ही तुमची जबाबदारी आहे. जर आता कृती केली नाही, तर भविष्यातील प्रत्येक अपघाताला अधिकाऱ्यांइतकेच तुम्हीही जबाबदार असाल, असा थेट इशारा त्यांनी ि दला आहे.

**नागरिकांमध्ये तीव्र संताप :** पावसाळ्यात आणि रात्रीच्या अंधारात ही मॅनहोल्स दुचाकीस्वारांसाठी काळ ठरत आहेत. ड. धनावत यांच्या या भूमिकेनंतर आता शहरातील नागरिकही आक्रमक होण्याची चिन्हे असून, रस्ते सुधारणार की जनतेच्या जीवाशी खेळत राहणार? असा संतप्त सवाल विचारला जात आहे.

नियमित वाचा
दैनिक आत्ताच एक्सप्रेस

Date-21-01-26

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र आत्ताच एक्सप्रेस

CHANGE IN NAME
I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME

Old Name:
SAYED IMROZ
New Name:
SAYED IMROZ SAYED AKBAR
Address: Satona Khurd, TQ Partur, Dist Jalna, Pin Code - 431502
MOBILE NO : 9075438444

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247

The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813